# कौटुंबिक न्यायालय, पुणे

## कार्यालयीन आदेश क्र. आस्था/१३७/२०२०

<u>वाचा</u> : १) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे दिनांक ०३/०६/२०२० रोजीची मानक कार्यप्रणाली

२) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाची दिनांक १६/०६/२०२० रोजीची मानक कार्यप्रणाली

३) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र. Insp/90/2020, दिनांक ०५/०९/२०२०

४) या कार्यालयाचे आदेश क्र. आस्था/१२८/२०२०, दिनांक ०२/०९/२०२०

५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र. बी (ii)(१६)/१३/२०२०, दिनांक ०७/०९/२०२०

६) ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाचे पत्र क्र. Insp./95/2020, दिनांक १०/०९/२०२०

## कार्यालयीन आदेश

प्रमुख न्यायाधीश, कौटुंबिक न्यायालय, पुणे कार्यालयीन कामकाज सुरळीतपणे पार पाडण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करीत आहेत,

ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भ क्र. ६ वरील पत्रानुसार न्यायिक अधिकारी यांच्या कार्यालयीन कामाकाजाबाबत खालीलप्रमाणे सुधारित आदेश नव्याने निर्गमित करण्यात येत आहेत,

१. या कार्यालयाचे कामकाज दिनांक ११/०९/२०२० पासून एका शिफ्टमध्ये चालू राहील, त्याबाबतची वेळ खालीलप्रमाणे आहे

| | | |
|---|---|---|
| न्यायालयीन कामाकाजाची वेळ | : | सकाळी ११.०० ते दुपारी २.०० |
| कार्यालयीन कामाकाजाची वेळ. | : | सकाळी १०.३० ते दुपारी २.३० |

या कार्यालयाचे उपरोक्त संदर्भ क्र. ४ वरील न्यायिक अधिकारी यांच्या कार्यालयीन कामकाजाबाबतचे आदेश या आदेशाद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२. या कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व न्यायिक अधिकारी दिनांक ११/०९/२०२० रोजीपासून रोज कार्यालयात हजर राहतील. याद्वारे या कार्यालयाच्या आस्थापनेवर सध्या कार्यरत असलेल्या सर्व न्यायिक अधिकारी यांना सुचित करण्यात येते की त्यांनी ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाने दिनांक ०३/०६/२०२० व दिनांक ०५/०९/२०२० रोजीच्या मानक कार्यप्रणालीमधील सर्व मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यालयीन कामकाज पार पाडावे.

३. उपरोक्त सदंर्भ क्र. ५ वरील परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार कर्मचा-यांची उपस्थिती अनिवार्य करण्यात येत आहे.

४. ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाच्या दिनांक ०५/०९/२०२० रोजीच्या मानक कार्यप्रणालीमधील निर्देशांनुसार कौटुंबिक न्यायालय, पुणे या कार्यालयाच्या आस्थापनेवरील सर्व विवाह समुपदेशक, न्यायालय व्यवस्थापक, प्रबंधक, स्वीय सहायक, लघुलेखक ग्रेड १, लघुलेखक ग्रेड-३ व अधिक्षक, शिरस्तेदार यांनी कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी दररोज कार्यालयात उपस्थित राहणे अनिवार्य करण्यात येत आहे.

५. संदर्भ क्र. ३ मधील निर्देशानुसार वर्ग ३ व ४ मधील कर्मचारी यांनी ३०% किंवा ३० यापैकी जास्त असेल त्या संख्येत कार्यालयात उपस्थित रहावे.

६. कोविड-१९ या महामारीसंबंधी गृह मंत्रालय, भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार मार्गदर्शक तत्वांचे व ना. उच्च न्यायालय, मुंबई या कार्यालयाने उपरोक्त सदंर्भांकित परिपत्रकांतील मार्गदर्शक सुचनांचे तंतोतंत काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

७. कौटुंबिक न्यायालय, पुणे या कार्यालयाच्या कामकाजासाठी दिनांक ०८/०९/२०२० ते पुढील आदेश होईपर्यंत या पूर्वी निर्गमित केलेल्या आदेशानुसार नियुक्त केलेले कर्मचारी उपस्थित राहतील.

त्याप्रमाणे संबंधितांना कळविण्यात यावे.

सही/-
(सुभाष रं. काफरे)
प्रमुख न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, पुणे.

पुणे
दिनांक : १०/०९/२०२०